कृषि विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपुर

वार्षिक अहवाल २०२१

KRISHI VIGYAN KENDRA, DUDHBARDI, NAGPUR

ANNUAL REPORT 2021

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरण	पृष्ठ क्र.
१.	महत्वाचे दिवस	६-१५
२.	परिषद	१७
३.	प्रशिक्षण	१९-२१
४.	कार्यशाळा	२३-२४
५.	शास्त्रज्ञ शेतकरी परिसंवाद	२६
६.	इतर विस्तार कार्य	२८-२९

अ. क्र.	दिनांक	विषय	गाव/ ठिकाण	सहभाग्याची संख्या
		महत्वाचे उत्सव		
१.	०८/०३/२०२१	जागतिक महिला दिन साजरा (ऑनलाइन वेबिनार)	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	८४
२.	२२/०३/२०२१	जागतिक जल दिन साजरा (ऑनलाइन वेबिनार)	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	९९
३.	२४/०४/२०२१	जागतिक वैद्यकीय दिन (ऑनलाइन वेबिनार)	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	९९
४.	०८/१०/२०२१	जागतिक अंडी दिन (ऑनलाइन वेबिनार)	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	८४
५.	०१/११/२०२१	वसुबारस - २०२१ साजरी	परसोडी, ता. सावणेर, जि. नागपुर	३९
६.	२६/११/२०२१	राष्ट्रीय दूध दिवस साजरा	परसोडी, ता. सावणेर, जि. नागपुर	१११
७.	२९/११/२०२१	राष्ट्रीय दूध दिवस (ऑनलाइन वेबिनार)	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	८४
८.	०३/१२/२०२१	स्वच्छ दूध उत्पादन दिवस	बोरडोह, ता. कळमेश्वर, जि. नागपुर	१८
९.	०५/१२/२०२१	जागतिक मृदा दिवस साजरा	पाटणसावंगी, ता. सावणेर, जि. नागपुर	३६
१०.	२३/१२/२०२१	शेतकरी दिवस साजरा	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	१६
		Total	**10**	**670**
		परिषद		
१.	२९/१०/२०२१	शेतकऱ्यांसाठी " कापूस, तूर आणि हरभरा या वरील कीड व रोग व्यवस्थापन " या विषयावर परिषद	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर	३०
		Total	**01**	**30**
		प्रशिक्षण		
१.	२४/०८/२०२१	अनुसूचित जातीतील संत्र /मोसंबी/ लिंबू बागायतदाराचे प्रशिक्षण कार्यक्रम	सोनोली, ता. कळमेश्वर, जि. नागपुर	२०
२.	२३/१२/२०२१ ते २९/१२/२०२१	पशू खाद्य व व्यवस्थापन प्रशिक्षण	शेतकरी भवन, मपमविवि, नागपुर.	१६
३.	२७/१२/२०२१	धिंगरी आळिंबी लागवड	परसोडी, ता. सावणेर, जि. नागपुर	४६
		Total	**03**	**82**
		कार्यशाळा		
१.	३०/१२/२०२१	पशुधन व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक आणि उपचार	पिपरिया ता. रामटेक, जि. नागपुर	१९
२.	३१/१२/२०२१	रोपवाटीकेबद्दल कार्यशाळा	नंदनवन ता. नागपुर, जि. नागपुर	४०
		Total	**02**	**59**
		शास्त्रज्ञ शेतकरी परिसंवाद		
१.	१९/१०/२०२१	वरिष्ठ शास्त्रज्ञानी वर्धा येथे केले शेतकऱ्यांना मार्गदर्शन	वर्धा ता. वर्धा, जि. वर्धा	४५
		Total	**01**	**45**
		इतर विस्तार कार्य		
१.	१७/०९/२०२१	पशुरोग निदान व चिकित्सा शिबीर	बेलदा, ता. रामटेक, जि. नागपुर	५०

२.	१८/०९/ २०२१	महाभियान या अभियाना अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, दूधबुर्डी आणि एफको द्वारा प्रायोजित भाजी बियाणे वाटप	बेलदा, ता. रामटेक, जि. नागपुर	५०
		Total	**02**	**100**
		Total	**17**	**986**

महत्वाचे उत्सव

१. कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर द्वारे "जागतिक महिला दिन साजरा"

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर , नागपूर पशुवैद्यकीय आणि मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च २०२१ रोजी "शेती आणि संबंधित क्षेत्रातील महिलांचा सहभाग" या विषयावर ऑनलाइन वेबिनार आयोजित करून "जागतिक महिला दिन" साजरा केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उषा डोंगरवार, सहयोगी प्राध्यापक, कृषीशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, नागपूर उपस्थित होत्या. या वेबिनारमध्ये एकूण ८४ शेतकरी व ग्रामीण युवक सहभागी झाले होते. डॉ. वैशाली बंठिया, डॉ. सारिपुत लांडगे आणि डॉ. के. एस. राठोड यांनी डॉ. एस. बी. कविटकर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. डॉ.सोनाली बोरकर यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले.

Celebration of ''International Women's Day" by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

On the occasion of "International Women's Day" on Dated 8 March 2021 Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur, Nagpur Veterinary College, Nagpur, and Fishery Science College, Nagpur jointly organised an online Webinar on "Participation of Women in Agriculture and Allied Sectors. Dr. Usha Dongarwar, Associate Professor, Department of Agronomy, College of Agriculture, Nagpur present as chief guest. Dr. Vaishali Banthia, Dr. Sariput Landge, and Dr. K. S. Rathod worked hard to organise the programme, which was overseen by Dr. S. B. Kawitkar, Associate Dean, Nagpur Veterinary College, Nagpur. Dr. Sonali Borkar expressed gratitude to the dignitaries and attendees. The webinar was attended by 84 farmers and rural youth.



Fig. Online Webinar on International Women's Day

२. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर द्वारे "जागतिक जल दिन साजरा"

कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर, पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ मार्च २०२१ रोजी "जलसंवर्धनाचे महत्त्व" या विषयावर ऑनलाइन वेबिनार आयोजित करून "जागतिक जल दिन" साजरा करण्यात आला. डॉ. नीलकांत मिश्रा, संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जलजीविका केंद्र यांनी एकूण ९९ शेतकरी आणि वेबिनारमध्ये ग्रामीण तरुणांना मार्गदर्शन केले. डॉ. सत्यजीत बेलसरे आणि डॉ. वैशाली बंठिया यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. डॉ. एस. बी. कविटकर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि डॉ. एस. डब्ल्यू. बोंडे, सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांनी वेबिनारच्या आयोजनासाठी मार्गदर्शन केले. डॉ. सारीपूत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर-२ यांनी प्रास्ताविक करून शाश्वत मत्स्यशेतीसाठी पाण्याचे महत्त्व सांगितले, तर डॉ. सत्यजीत बेलसरे यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले.

Celebration of ‘‘World Water Day” by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

On the occasion of ‘‘World Water Day” on Dated 22 March 2021 Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur, Nagpur Veternery College, and Fishery Science College, Nagpur jointly organised an online Webinar on “Importance of Water Conservation". Dr. Neelkant Mishra, Founder and CEO Jaljeevika Kendra guided farmers and rural youth in the webinar. Dr. Satyajit Belsare and Dr. Vaishali Banthia took the initiative to organize the programme. Dr. S. B. Kawitkar, Associate Dean, Nagpur Veterinary College, Nagpur and Dr. S. W. Bonde, Associate Dean, College of Fisheries Science, Nagpur guided for the organization of the webinar. Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur-2 introduced the importance of water for sustainable fish farming, while Dr. Satyajit Belsare thanked the dignitaries and the attendees. A total of 99 farmers and rural youth attended the webinar





Fig. Online Webinar on “World Water Day"

३. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर द्वारे "जागतिक वैद्यकीय दिन" साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर, रिलायंस फाऊंडेशन, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि पशुसंवर्धन विभाग यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पशुवैद्यकीय दिनाच्या निमित्ताने २४ एप्रिल २०२१ रोजी जागतिक पशुवैद्यकीय दिनाच्या कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले. त्या निमित्याने "कोविड-१९ संकटात पशुवैद्यकाचा प्रतिसाद" या विषयावर ऑनलाइन वेबिनार युट्युबवर लाईव्ह प्रसारित करून "जागतिक पशुवैद्यकीय दिन" साजरा करण्यात आला. डॉ. व्ही. डी. अहेर, सहयोगी अधिष्ठाता, नागपुर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर आणि संचालक शिक्षण विस्तार, माफसु, नागपूर यांनी शेतकरी आणि ग्रामीण तरुणांना वेबिनारमध्ये मार्गदर्शन केले. डॉ. किशोर बन्सोड, पशुवैद्यकीय विकास अधिकारी, यवतमाळ, डॉ. सारीपूत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी नागपूर-२ यांनी प्रास्ताविक करून सांगितले आणि कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. एकूण ९९ शेतकरी आणि ग्रामीण तरुणांनी या कार्यक्रमात सहभाग घेतले.

Celebration of "World Veterinary Day" by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

The World Veterinary Day program was organized on 24th April 2021 on the occasion of World Veterinary Day in association with Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, Reliance Foundation, Nagpur Veterinary College, Nagpur and Department of Animal Husbandry Yavatmal. To mark the occasion, an online webinar on "Veterinary Response to the Covid-19 Crisis" was broadcast live on YouTube to celebrate "World Veterinarian Day".Dr. V. D. Aher, Associate Dean, Nagpur Veterinary College, Nagpur and Director Education Extension, Mafsu, Nagpur guided a total of 99 farmers and rural youth in the webinar. Dr. Kishore Bansod, Veterinary Development Officer, Yavatmal, Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur-II gave the introduction and took the initiative to organize the programme. A total of 99 farmers and rural youth attended the programme.

Fig. Online Webinar on "World Veterinary Day"

४. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर द्वारे "जागतिक अंडी दिन" साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर, सांगली आणि ठाणे व महाराष्ट्र पशु व मत्स विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सायंकाळी ८ वाजता. "महाराष्ट्रातील तरुणांना अंडी उद्योगात रोजगाराच्या संधी" या विषयावर ऑनलाइन वेबिनार आयोजित करून "जागतिक अंडी दिन" साजरा केला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे प्रा. कर्नल डॉ. ए. एम. पातूरकर मा. कुलगुरू, म.प.म.वि.वि. नागपूर, मा. डॉ. लाखान सिंग, संचालक, अटारी पुणे आणि प्रा. डॉ. अनिल भिकाने मा. संचालक, विस्तार शिक्षण संचालनालय म.प.म.वि.वि. नागपूर हे होते तर प्रमुख पाहुणे डॉ. व्ही. डी. अहेर, सहयोगी अधिष्ठाता, नागपुर पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ, डॉ. आ. पा. सोमकूंवर, सहयोगी अधिष्ठाता नागपुर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच वक्ते म्हणून लाभलेले प्रा. डॉ. अजित रानडे सहयोगी अधिष्ठाता , मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांनी महाराष्ट्रातील तरुणांना अंडी उद्योगात रोजगाराच्या संधी याविषयावर मार्गदर्शन केले. वेबिनारमध्ये एकूण ८४ शेतकरी व ग्रामीण युवक सहभागी झाले होते. डॉ. सारीपूत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर-२. डॉ. अनिल उलेमाले प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र सांगली-२, डॉ. सुरेश जगदाळे प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, ठाणे कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

Celebrating "World Egg Day" by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

On 8th October 2021 at 8 p.m., Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, Sangli, and Thane, in collaboration with Maharashtra Animal and Fishery Science University, Nagpur, celebrated "World Egg Day" by hosting an online webinar on "Employment Opportunities for Youth in the Egg Industry in Maharashtra". Prof. Colonel Dr. A. M. Paturkar, Vice-Chancellor, MAFSU Nagpur, Hon. Dr. Lakhan Singh, Director, Atari Pune, and Prof. Dr. Anil Bhikane, Hon. Director, Directorate of Extension Education, MAFSU, Nagpur, were the chief guests in this programme, while the chief guests were Dr. V. D. Aher, Associate Dean, Nagpur Veterinary College, Shirwal, and Dr. A. P. The webinar was joined by 84 farmers and rural youth. Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur-2; Dr. Anil Ulemale, Head, Krishi Vigyan Kendra, Sangli-2; and Dr. Suresh Jagdale, Krishi Vigyan Kendra, Thane gone to great lengths to organise the event.

Fig. Online Webinar on "World Egg Day"

५. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे " वसुबारस – २०२१ " साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, रिलायन्स इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, नागपूर आणि म.प.म. वि. वि. नागपूर यांच्या सहकार्याने १ नोव्हेंबर २०२१ रोजी परसोडी ता. कळमेश्वर येथे वसुबारस सण साजरा करण्यात आला व शेतकरी शास्त्रज्ञ परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. अनिल भिकाने, विस्तार संचालक, माफसू, नागपूर यांनी शेतीतील पशुधनाविषयी व शेती समृद्ध करण्यासाठी गोसंवर्धन यावर आवश्यक मार्गदर्शन केले, डॉ. सारिपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी कृषी विज्ञान केंद्राविषयी प्रास्ताविक केले. तसेच या कार्यक्रमात श्रीमती उषा कडू (सरपंच, परसोडी), श्री. संदिपराव उपाध्ये (उपसरपंच, परसोडी), धम्मदिप गोंडाणे (सहाय्यक कार्यक्रम व्यवस्थापक रिलायन्स फाऊंडेशन), कृषी विज्ञान केंद्राचे विशेषज्ञ/तज्ञ अतिथी वक्त्यांसह व्यासपीठावर उपस्थित होते. या उत्सवात एकूण ३९ शेतकरी व ग्रामीण युवक सहभागी झाले होते.

Celebrating Vasubaras – 2021 Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

On November 1, 2021, the Vasubaras Festival and Farmer Scientist Symposium were held at Parsodi ta Kalameshwar in collaboration with Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, Reliance Information Services, Nagpur, and Mafsu Nagpur. Dr. Anil Bhikane, Extension Director, MAFSU, Nagpur, provided necessary guidance on farm livestock and cow breeding to enrich agriculture in this programme, and Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, provided an introduction to the Krishi Vigyan Kendra. Mrs. Usha Kadu (Sarpanch, Parsodi), Shri. Sandiparao Upadhyay (Upsarpanch, Parsodi), Dhamdeep Gondane (Assistant Program Manager Reliance Foundation), Specialists/Experts from Krishi Vigyan Kendra, and guest speakers were also present on the dais. This festival drew a total of 39 farmers and rural youth.

शेतकरी शास्त्रज्ञ परिसंवाद

शेती समृद्ध करण्यासाठी गोसंवर्धन आवश्यक-प्रा. डॉ. अनिल भिकाने

माफसूने वसुबारस साजरी केली शेतकऱ्यांसोबत

ना रत्न डॉ. मोतीरावेन यांची पुण्यतिथी साजरी

भांडेवाडी परिसर पार्टीचे सदस्य

Fig. Celebration of "Vasubaras" at Parsodi

६. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे राष्ट्रीय दूध दिवस साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, येथे २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मॉर्निंग स्टार कान्वेंट सावनेर आणि नत्थुजी डांगोरे माध्यमिक विद्यालय, परसोडी याच्या संयुक्त विद्यमानाने "राष्ट्रीय दूध दिवस" साजरा करण्यात आला. यात रोजच्या आहारात दूध आणि दुग्धजन्य पदार्थाचे महत्व या विषयी जागरूकता निर्माण होण्याच्या उद्देशयाने हा कार्यक्रम घेण्यात

आला. या कार्यक्रमात डॉ . शेखर बढे, सहाय्यक प्राध्यापक, पशु वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी दुधाचे पोषण मूल्य, आरोग्यवर्धक महत्व, वाढीच्या वयात दुधातील प्रोटीन, स्निग्धांश आणि ए -१, ए -२ दूध काय असत यावर मार्गदर्शन केले, तसेच या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ डॉ. अमोल हरणे, डॉ. अश्विनी गायधनी, श्री. तुषार मेश्राम आणि मयूरी ठोंबरे यांनी केले. या कार्यक्रमात एकूण १११ विद्यार्थी सहभागी झाले होते.

Celebrating National Milk Day Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

"National Milk Day" was celebrated by Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur on November 26, 2021 at Morning Star Convent, Saoner and Natthuji Dangore Secondary School, Parsodi. This program was conducted with the aim of creating awareness about the importance of milk and milk products in the daily diet. A total of 111 students participated in this program. Dr. Shekhar Bade, Assistant Professor, Nagpur Veterinary College, Nagpur, gave guidance on the nutritional value of milk, health benefits, milk content protein, lipids at growing age, and what is A-1, A-2 type in milk. The program was organized by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur subject matter specialist's Dr. Amol Harne, Dr. Ashwini Gaidhani, Tushar Meshram and Mayuri Thombare.

Fig. Celebration of "National Milk Day" at Parsodi

७. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर द्वारे राष्ट्रीय दूध दिवसा निमित्त आयोजित शास्त्रोक्त तूप निर्मिती तंत्रज्ञान ऑनलाइन व्याख्यान

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी व पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपूरच्या वतीने कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी सकाळी ९ वा. "राष्ट्रीय दुग्ध दिवस" या निमित्ताने "शास्त्रोक्त तूप निर्मिती तंत्रज्ञान" या विषयावर ऑनलाइन वेबिनार आयोजित करून साजरा केला. या कार्यक्रमात डॉ.अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण, माफसू, नागपूर डॉ. आ. पा. सोमकूंवर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, डॉ. एस. व्ही. उपाध्ये मा. संचालक शिक्षण आणि अधिष्ठाता, माफसू, नागपूर आणि प्रा. डॉ. नितिन कुरकुरे मा. संचालक संशोधन, माफसू, नागपूर तसेच प्रमुख वक्ते मा. डॉ. डी. डी. पतंगे, सहयोगी प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांनी डॉ. उषा डोंगरवार, सहयोगी प्राध्यापक, कृषीशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, नागपूर. वेबिनारमध्ये एकूण ८४ शेतकरी व ग्रामीण युवक सहभागी झाले होते. डॉ. वैशाली बंठिया, विषय विशेषज्ञ, केव्हीके, नागपूर डॉ. सरिपुत लांडगे आणि डॉ. के. एस. राठोड यांनी डॉ. एस. बी. कविटकर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यकीय

महाविद्यालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. डॉ. सोनाली बोरकर यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले.

Scientific Ghee Manufacturing Technology Online Lecture organized by Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur on the occasion of National Milk Day

KVK, Dudhbardi, Nagpur in collaboration with Veterinary College, Nagpur on November 29, 2021 at 9 a.m. In honour of "National Milk Day," we hosted an online webinar on "Scientific Ghee Manufacturing Technology." Dr. Anil Bhikane, Director of Extension Education at MAFSU Nagpur, will participate in this programme. Dr. Pa. Somkunwar, Associate Dean, Nagpur Veterinary College, Nagpur, Dr. S. V. Upadhyay, Hon. Director Education and Principal, MAFSU, Nagpur, and Prof. Dr. Nitin Kurkure, Hon. Director Research, MAFSU, Nagpur, as well as keynote speaker Hon. Dr. D. D. Patnge, Associate Professor, Department of Animal Husbandry and Dairy Science, College of Agriculture, Kolhapur Dr. Usha Dongarwar is an Associate Professor in the Department of Agriculture at Nagpur College of Agriculture. The webinar was attended by 84 farmers and rural youth. Dr. Vaishali Banthia, NVC, Nagpur, Dr. Sariput Landge, and Dr. K. S. Rathod, as well as Dr. S. B. Kavitkar, Associate Dean, Nagpur Veterinary College, Nagpur, gone to great lengths to put on the event. Dr. Sonali Borkar expressed gratitude to the dignitaries and attendees.

दूध उत्पादनाकरिता जनावरांचे आरोग्य महत्त्वाचे

नागपूर : महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त स्वच्छ दूध उत्पादन दिवस म्हणून साजरा करण्यात आला. दूध उत्पादनाकरिता गोठ्याची स्वच्छता आणि जनावरांचे आरोग्य कसे महत्त्वाचे आहे यावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने, वरिष्ठ वैज्ञानिक तथा प्रकल्प समन्वयक डॉ. सारीपुत लांडगे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रभाकर टेंभुर्णे, पशुधन विकास अधिकारी डॉ. एरोस सोमकुवर, डॉ. अमोल हरणे, डॉ. अश्विनी गायधनी, मयुरी ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले.

Fig. online webinar on "Scientific Ghee Manufacturing Technology"

८. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे स्वच्छ दूध दिवस साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर द्वारे ३ डिसेंबर, २०२१ रोजी बोरडोह आणि बोरगाव ता. कळमेश्वर येथे "स्वछ दूध दिवस" साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये डॉ. प्रभाकर टेम्भुर्णे, सहाय्यक प्राध्यापक, पशु वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी कॅलिफोर्निया मास्टीटीस टेस्ट चे प्रात्यक्षिक दाखविले व स्वछ दूध उत्पादनासाठी शेतकऱ्याना, ग्रामस्थांना महत्व पटवून दिले. तसेच डॉ सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी जनावरांचे आरोग्य आणि गोठ्याची स्वछता यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात डॉ. सोमकुवर पशुधन विकास अधिकारी, कळमेश्वर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला १८ शेतकरी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ डॉ. अमोल हरणे, डॉ. अश्विनी गायधनी, श्री. तुषार मेश्राम आणि मयूरी ठोंबरे यांनी केले.

Clean Milk Day celebrated by Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, MAFSU Nagpur

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur on 3rd December, 2021. "Swach Dudh Diwas" was celebrated at Bordoh and Borgaon Kalmeshwar. In this Dr. Prabhakar Tembhurne, Assistant Professor, Veterinary College, Nagpur demonstrated the California Mastitis Test and conveyed the importance of clean milk production to the farmers and villagers. Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur gave guidance on animal health and cowshed hygiene. In this program Dr. Somkuwar, Livestock Development Officer, Kalmeshwar was present. 18 farmers attended this program. Also this program was organized by subject Matter specialist Dr. Amol Harne, Dr. Ashwini Gaidhani, Shri. Tushar Meshram and Mayuri Thombare.

Fig. Celebration of "Swach Dudh Diwas"

९. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे "जागतिक मृदा दिवस" साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर, कृषी विभाग, सावनेर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 5 डिसेंबर 2021 रोजी पाटणसावंगी ता. सावणेर येथे 'जागतिक मृदा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण, MAFSU, नागपूर यांनी मार्गदर्शन केले आणि 'माती चांगली, आपले आरोग्य चांगले' असा

संदेश दिला. डॉ.सरिपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी शेतकऱ्यांना मातीचे नमुने तपासणीसाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात पाटणसावंगीच्या सरपंच सौ.रोशनी ठाकरे व कु. शुभांगी राठोड, तालुका कृषी अधिकारी, सावनेर उपस्थित होते. कार्यक्रमाला 36 शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अमोल हरणे, विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण), डॉ. अश्विनी गायधनी, विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), श्री. तुषार मेश्राम, विषय विशेषज्ञ (कृषी विस्तार) आणि कु. मयुरी ठोंबरे, विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान) यांनी केले.

Celebration of ‘‘World Soil Day’’ by Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur

Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur, in association with the Department of Agriculture, Savner, celebrated "World Soil Day" at Patansawangi Ta. Saoner on December 5, 2021. The chief guest in this programme, Dr. Anil Bhikane, Director Extension, MAFSU, Nagpur, guided and conveyed the message that "soil is good; our health is good." Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur, guided the farmers on the precautions to be taken while taking soil samples for testing. Also in this program, Mrs. Roshni Thakary, Sarpanch, Patansawangi, and Ku. Shubhangi Rathod, Taluka Agriculture Officer, Savner, were present. The programme was attended by 36 farmers. This programme was organised by Dr. Amol Harne, Subject Matter Specialist (Plant Protection) Dr. Ashwini Gaidhani, Subject Matter Specialist (Horticulture), Mr. Tushar Meshram, Subject Matter Specialist (Agricultural Extension) And Ms. Mayuri Thoshe, Subject Matter Specialist (Home Science).

जागतिक मृदा दिनानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...

पाटणसावंगी ■ जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून पाटणसावंगी ग्रा.पं. सभागृहात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयातर्फे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रोशनी ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अनिल भिकाने, नंदकिशोर राऊत, दीपक दलाल आदी उपस्थीत होते. यावेळी सावनेर तालुका कृषी अधिकारी शुभांगी राठोड यांनी उपस्थित शेतकऱ्यां मृदा दिवसाचे महत्त्व पटवून दिले. पर्यवेक्षक रोशन डंभारे यांनी मृदा परिक्षण कसे करावे, माती परिक्षणाचे नमुने कसे घ्यावे तसेच जीवामृत बनविण्याची पद्धत याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. सारीपूत लांडगे, वरिष्ठ वैज्ञानिक तथा प्रकल्प समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी माती परीक्षणासाठी मातीचे नमूने घेताना घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले. दरम्यान नंदापूर येथील प्रगतीशिल शेतकरी तुळशीराम पाटील यांचा डॉ. भिकाने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालन मयुरी ठोंबरे यांनी केले तर आभार डॉ. अश्विनी गायधनी यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ. अमोल हरणे, ि तुषार मेश्राम तसेच ग्रा.पं. कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

Fig. Celebration of ‘World Soil Day’.

१०. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, आणि विस्तार शिक्षण संचालनालय, म. प. म. वि. वि. नागपूर यांच्या सहकार्याने " राष्ट्रीय शेतकरी दिवस" २३ डिसेंबर २०२१ रोजी कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर येथे साजरा करण्यात आला. यात उपस्थित शेतकऱ्याचा सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमात डॉ. अनिल भिकाने यांनी पशु खादय निर्मितीतून रोजगार या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी कृषि विज्ञान केंद्र हे नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांनपर्यंत पोहचवण्यासाठी आहे म्हणून शेतकऱ्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहावे असे आव्हान केले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्रातील डॉ. अमोल हरणे, विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण), डॉ. अश्विनी गायधनी, विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), श्री. तुषार मेश्राम, विषय विशेषज्ञ (कृषी विस्तार) आणि कु. मयुरी ठोंबरे, विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान) यांनी केले. या कार्यक्रमाला १६ शेतकरी उपस्थित होते.

Celebration "National Farmer's Day" by Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, MAFSU Nagpur

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, and the Directorate of Extension Education, MAFSU, Nagpur, jointly celebrated "National Farmer's Day" on December 23, 2021, at Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur. The present farmers were felicitated. Also, Dr. Anil Bhikane gave guidance about employment generation through animal feed production. In this program, Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra Dudhbardi, Nagpur, insists that the farmers stay in touch with the Krishi Vigyan Kendra, as it is meant to bring new technology to the farmers. This programme was organised by Dr. Amol Harne, Subject Matter Specialist (Plant Protection), Dr. Ashwini Gaidhani, Subject Matter Specialist (Horticulture), Mr. Tushar Meshram, Subject Matter Specialist (Agricultural Extension) and Ms. Mayuri Thombre, Subject Matter Specialist (Home Science). A total of 16 farmers attended this program.

राष्ट्रीय शेतकरी दिवस उत्साहात

देशोन्नती वृत्तसंकलन...

सावनेर ▪ महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपुर अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी आणि विस्तार शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दुधबर्डी येथे गुरुवार २३ डिसेंबरला राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक विस्तार शिक्षण मपमविवि डॉ. अनिल भिकाणे होते तर प्रमुख अतिथी म्हणून पद्माकर शिवणकर, उपसंचालक आत्मा, नागपुर आणि डॉ. सारीपुत लांडगे, कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी उपस्थित होते.

डॉ. अनिल भिकाने यांनी पशु खाद्य व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन केले. शेतकरी व युवकांना पशु खाद्य निर्मितीतून रोजगाराची संधी निर्माण होऊ शकते असे ते म्हणाले. यावेळी प्रगतशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. सरिपुत लांडगे यांनी प्रास्तविक केले. दूधबर्डीचेकृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांना प्रशिक्षण व नव नवीन तंत्रज्ञान पोहचवण्यासाठी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले. शिवणकर यांनी शेती आधारित जोडव्यवसाय करून आत्मनिर्भर होण्याचे सांगितले. सूत्रसंचालन मयुरी ठोंबरे (विषय विशेषज्ञ, गृह विज्ञान) यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अमोल हरणे (विषय विशेषज्ञ, पीक संरक्षण) डॉ. अश्विनी गायधनी (विषय विशेषज्ञ, उद्यानविद्या) आणि तुषार मेश्राम (विषय विशेषज्ञ, कृषी विस्तार) यांनी परिश्रम घेतले. (ता.प्र.)

Fig. Celebration of "National Farmer's Day"

परिषद

१. शेतकऱ्यांसाठी मोबाइल आधारित ऑडिओ कॉन्फरन्सचे आयोजन

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर आणि रिलायन्स इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, नागपूर यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांसाठी, दिनांक 29 ऑक्टोबर 2021 रोजी सायंकाळी 6.00 वा " तूर, हरभरा आणि कापूस यावरील कीड व रोग व्यवस्थापन" या विषयावरील मल्टी लोकेशन ऑडिओ कॉन्फरन्स घेण्यात आले. यात तीन विविध ठिकाणी डायल आउट कॉन्फरन्सच्या माध्यमाने, डॉ. अमोल आर. हरणे, विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण) आणि डॉ. सारिपुत पी. लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि केव्हीके प्रमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या शेती विषयक समस्याचे निराकरण केले. या कार्यक्रमाला ३० शेतकरी उपस्थित होते.

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur Organized Multi-location audio conference for Farmer

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi and Reliance Information Service Nagpur jointly organized a Multi-location audio conference on "Pest and Disease Management on Pigeon Pea, Gram and Cotton" was held on 29 June 2021 at 6.0 PM. In this through dial out conference at three different places, Dr. Amol R. Harne, Subject Matter Specialist (Plant Protection) and Dr. Sariput P. Lundge, senior scientist and head guided the farmers and solved their agricultural problems. Total 30 farmer join online platform.

Fig. Audio conference on "Pest and Disease Management on Pigeon Pea, Gram and Cotton"

प्रशिक्षण

१. कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, माफसु नागपूर आणि सी सी आर आय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यामानाने प्रशिक्षणाचे आयोजन

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, आणि भाकृअनुप- केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २४ ऑगस्ट २०२१ रोजी " अनुसूचित जाती उप योजना (SCSP)" अंतर्गत अनुसूचित जातीतील संत्र /मोसंबी/ लिंबू बगयात्दाराचे प्रशिक्षण कार्यक्रम व यंत्रांचे वाटप कळमेश्वर तालुक्यातील ग्राम. सोनोली येथे घेण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख पाहून म्हणून डॉ. डी. के. घोस, संचालक केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर, डॉ. ए. पी. सोमकुवर, संचालक, विस्तार शिक्षण संचालनालय, म.प.म. वि .वि नागपूर आणि डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर यांनी लिंबू वर्गीय फळांची लागवड व त्यावरील कीड व रोग व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले. तसेच कृषी उपकरणांचा व लिंबूवर्गीय रोपांचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षणात एकून २० अनुसुचीत जातीच्या शेतकऱ्याना उपकरणाचे वाटक करण्यात आले.

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, MAFSU Nagpur and CCRI, Nagpur. Was jointly organized training program.

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur and ICAR-Central Citrus Research Center, Nagpur jointly organized Training Program for Scheduled Caste Orange / Mosambi / Lemon Growers and Distribution of Machinery under "Scheduled Caste Sub Scheme (SCSP)" on 24th August 2021 At Sonoli, Tah Kalmeshwar Dist Nagpur. In this training program Dr. D. K. Ghos, Director, Central Citrus Research Institute, Nagpur, Dr. A. P. Somkuwar, Director, Directorate of Extension Education, MAFSU, Nagpur and Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur gave guidance on the cultivation of citrus fruits and their pest and disease management. Agricultural implements and citrus plants were also distributed. In this training, equipment was distributed to 20 scheduled caste farmers.

२. कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, माफसू नागपूर द्वारे पशु खादय व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, आणि विस्तार शिक्षण संचालनालय, म. प. म. वि. वि. नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नागपुर पुरस्कृत "ग्रामीण युवकांना कौशल्य आधारित प्रशिक्षण" योजने अंतर्गत "पशु खादय व्यवस्थापन" या ७ दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन २३ - २९ डिसेंबर, २०२१ रोजी कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, ता. कळमेश्वर येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाला नागपुर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील १६ शेतकरी उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्याचे नाव नोंदणी करून त्यांना प्रशिक्षण किट वाटप करण्यात आली. या कार्यक्रमासाठी विस्तार शिक्षण संचालनालय, म. प. म. वि. वि. नागपूर चे संचालक डॉ. अनिल भिकाने उदघाट्क म्हणून उपस्थित होते तसेच कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणाचे प्रकल्प उपसंचालक श्री. प्रभाकर शिवनकर अतिथि म्हणून उपस्थित होते. कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी चे डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी नागपूर यांनी पशुखादय निर्मिती या विषयावर मार्गदर्शन केले. या ७ दिवसीय प्रशिक्षणामध्ये विविध विषयांशी निगडीत तज्ञांनकडून

मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ श्री. तुषार मेश्राम, डॉ. अमोल हरणे, डॉ. अश्विनी गायधनी, आणि मयूरी ठोंबरे यांनी केले.

Animal Feed Management Training organized by Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Mafsu Nagpur

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, and Directorate of Extension Education, MAFSU, Nagpur organized a 7-day training on “Animal Feed Management” under “Skill Based Training for Rural Youth” scheme sponsored by Agriculture Technology Management Agency (ATMA), Nagpur on 23rd-29th December, 2021 it was done at Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur. 16 farmers from various talukas of Nagpur district attended this training. The names of the present farmers were registered and training kits were distributed to them. For this program Directorate of Extension Education, Dr. Anil Bhikane was present as the inaugulator and Deputy Director of Agricultural Technology Management System Mr. Prabhakar Shivankar was present as guest. Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, of Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, and Nagpur gave guidance on the topic of animal fodder production. This 7-day training was guided by experts in various disciplines. This program was organized by subject specialist of Krishi Vigyan Kendra Shri. Tushar Meshram, Dr. Amol Harne, Dr. Ashwini Gaidhani, and Mayuri Thombare.

Media Varta News

दूधबर्डी येथे कृषी व पशु खाद्य व्यवस्थापन या विषयावर सात दिवसीय प्रशिक्षण संपन्न.

युवराज मेश्राम
नागपुर जिल्हा प्रतिनिधी
9923296442

कळमेश्वर/नागपुर:- कळमेश्वर पासून दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या दूधबर्डी येथे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र आणि विस्तार शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नागपुर पुरस्कृत ग्रामीण युवकांना कौशल्य आधारित प्रशिक्षण या योजने अंतर्गत “पशु खाद्य व्यवस्थापन” या विषयावर २३ ते २९ डिसेंबर या कालावधीत सात दिवसीय प्रशिक्षणचे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी नागपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील १६ प्रगतशील शेतकरी सहभागी झाले. या कार्यक्रमासाठी विस्तार शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर चे संचालक डॉ. श्री.अनिल भिकाने अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणाचे प्रकल्प उपसंचालक श्री. प्रभाकर शिवणकर आणि कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डीचे कार्यक्रम समन्वयक डॉ. सारीपुत लांडगे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

Fig. Training on “Animal Feed Management” under “Skill Based Training for Rural Youth” scheme

०३. शेतकऱ्यांसाठी धिंगरी आळिंबी लागवड एकदिवसीय प्रशिक्षण

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, च्या वतीने दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी मौजा परसोडी ता. कळमेश्वर जि. नागपुर येथे एकदिवसीय “धिंगरी आळिंबी लागवड” प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात कु. मयूरी ठोंबरे, विषय विशेषज्ञ (गृह विज्ञान) केव्हीके, दूधबर्डी, नागपूर यांनी शेतकऱ्यांना"धिंगरी आळिंबी लागवड” या विषयावर मार्गदर्शन केले तसेच धिंगरी आळिंबीतून मिळणाऱ्या पोषक तत्वांचे आहारातील महत्व पटवून दिले. या प्रशिक्षणात श्री. अमोघ मेश्राम, संचालक,

अमोर फार्म हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते त्यांनी शेतकऱ्यांन सोबत धिंगरी आळिंबी लागवड करतानाचे स्वअनुभव तसेच मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अमोल हरणे, विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण) केव्हीके, दूधबर्डी, नागपूर यांनी शेतकऱ्यांनाधिंगरी आळिंबी शेती पूरक व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त केले. या प्रशिक्षणात ४६ शेतकरी सहभागी होते.

One Day Training on "Mushroom Cultivation" for Farmers

Krishi Vigyan Kendra, Dudhbardi, Nagpur, on 27th December, 2021 at Parsodi Distt. Kalmeshwar. A one-day training on "Mushroom Cultivation" was conducted at Nagpur. In this training Ms. Mayuri Thomabare, Subject Matter Specialist (Home Science) KVK, Dudhbardi, Nagpur guided the farmers on "Mushroom Cultivation" and also explained the nutritional importance of Mushrooms. Mr. Amogh Meshram, Director, Amor Farm was the expert guide in this training. Therefore, they were present and guided the farmers along with their personal experience of Mushroom Cultivation. Also Dr. Amol Harne, Subject Matter Specialist (Plant Protection) KVK, Dudhbardi, Nagpur motivated the farmers to take up Dhingri citrus farming as a complementary business. 46 farmers participated in this training.

धिंगरी आळिंबी उत्पादनातून युवकांना रोजगाराच्या संधी

सावनेर (ता.प्र.) :- महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, यांच्याद्वारे धिंगरी अळिंबी लागवड तंत्रज्ञान या विषयावर दिनांक २७/१२/२०२१ रोजी सावनेर पासून तीन किलोमीटर वर असलेल्या परसोडी येथे शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र,दूधबर्डी येथील वरिष्ठ वैज्ञानिक तथा प्रकल्प समन्वयक डॉ.सारीपुत लांडगे यांच्या मार्गदर्शनात विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान) कु.मयुरी ठोंबरे यांनी आळंबी लागवड तंत्रज्ञान या विषयावर ग्रामस्थांना प्रशिक्षण दिले. त्यामध्ये त्यांनी अळिंबी लागवडीबरोबरच अळिंबी चे मानवी आहारातील महत्त्व स्पष्ट केले.

अळिंबी मधून मिळणाऱ्या पोषक घटकांचे पोषणमूल्य मानवाचे योग्य आरोग्य राखण्यासाठी कसे आवश्यक आहे हे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषय विशेषज्ञ (पीकसंरक्षण) डॉ. अमोल हरणे यांनी केले. तसेच अळिंबी शेती हा शेतकऱ्यांसाठी एक फायदेशीर पूरक जोडधंदा आहे. याबद्दलचे मार्गदर्शन केले आणि शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्रामधुन प्रशिक्षण घ्यावे आणि धिंगरी अळिंबी शेती करावी याबद्दलचे प्रबोधन केले. या कार्यक्रमासाठी नागपूर येथील अमोर फार्म चे संचालक अमोघ मेश्राम हे अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यां सोबत आळिंबी शेती लागवड करतांनी येणारे स्वअनुभव कथित केले आणि शेतकऱ्यांना आळिंबी लागवडीकरिता प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाला परसोडी येथील सरपंच सौ उषाताई या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. तसेच परसोडी येथील उपसरपंच संदीप उपाध्ये, ग्रामसेवक सरला बोबडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला ४३ ग्रामस्थांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी [illegible] केंद्राती विषय विशेषज्ञ (विस्तार शिक्षण) [illegible] विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) डॉ. [illegible] यांनी परिश्रम घेतले.

Fig. Training on "Mushroom Cultivation"

कार्यशाळा

०१. शेतकऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा

कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, नागपूर, सातपुडा फाऊंडेशन, पिपरिया आणि पशु संवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विभाग, पंचायत समिति, रामटेक यांच्या वतीने दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी मौजा पिपरिया ता. रामटेक जि. नागपुर येथे “पशुधन व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक आणि उपचार यासंबंधी माहिती देणे आणि वन्य प्राण्यांद्वारे पशुधन हानी थांबवण्यासाठी उपाय” या विषयावर एकदिवसीय कार्यशाला घेण्यात आली. या प्रशिक्षणात श्री. तुषार मेश्राम (विषय विशेषज्ञ) आणि डॉ. अमोल हरणे (विषय विशेषज्ञ) केव्हीके, दूधबर्डी, नागपूर यांनी शेतकऱ्यांनाचारा पिकांची लागवड, यूरिया ट्रीटमेंट, मुरघास या विषयावर माहिती दिली तसेच त्या वरील रोग व किडी या संबंधीचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत १९ शेतकरी सहभागी होते.

One Day Workshop

On 30 December 2021 Krishi Vigyan Kendra, Dudhbardi Nagpur, Department of Animal Husbandry and Dairying, Panchayat Samiti, Ramtek and Satpuda Foundation, Pipriya jointly conduct a one day workshop on “Livestock Management, Information on Disease Prevention and Treatment and Measures to Stop Loss of Livestock by Wild Animals” at pipariya Tah Ramtek Dist Nagpur. In this training Mr. Tushar Meshram, Subject Matter Specialist (Agricultural Extension), and Dr. Amol Harne, Subject Matter Specialist (Plant Protection) of KVK, Dudhbardi, Nagpur gave information to the farmers on cultivation of fodder crops, urea treatment, poultry and guided them regarding diseases and pests. 19 farmers participated in this workshop.

THE TIMES OF INDIA

crop protection

Vijay Pinjarkar / TNN / Updated: Dec 31, 2021, 18:48 IST

Satpuda Foundation, an NGO working with communities, in association with Krishi Vigyan Kendra, Dudhbardi (Kalmeshwar), and the department of animal husbandry and dairying, Ramtek, had organized a one-day session for the stakeholders

Nagpur: At a time when crop and livestock depredation cases are on the rise in the state, villagers living on the fringes of Pench Tiger Reserve, Maharashtra, were given lessons on how to get rid of the problem.

Satpuda Foundation, an NGO working with

Fig. one-day workshop on “Livestock Management, Information on Disease Prevention and Treatment and Measures to Stop Loss of Livestock by Wild Animals”

०२. कार्यशाळेमध्ये शेतकऱ्यांना रोपवाटिके बद्दल मार्गदर्शन

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना" अंतर्गत 3 दिवसीय रोपवाटिका प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमात दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी पार पडला. या प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक म्हणून, डॉ. अश्विनी गायधनी, विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) केव्हीके, दूधबर्डी, नागपूर यांनी शेतकऱ्याना "रोपवाटिकेतील माध्यमांची गरज, माध्यमाचे निर्जंतुकीकरण व माध्यम तयार करताना घ्यावयाची काळजी" या विषयावर मार्गदर्शन केले.

One day workshops on nursery management

A 3-day nursery hands-on training program was held on 31st December, 2021 under "Punyashlok Ahilya Devi Holkar Nursery Scheme" organized jointly by Maharashtra State Board of Horticulture and Medicinal Plants and Maharashtra Cooperative Development Corporation. Dr. Ashwini Gaidhani, Subject Specialist (Horticulture) KVK, Dudhbardi, Nagpur served as the training's expert instructor and advised the farmers on the "Need of media in nursery, sterilisation of media, and care to be given while preparing media.

"Fig. one-day workshop on nursery management

शास्त्रज्ञ शेतकरी परिसंवाद

१. वरिष्ठ शास्त्रज्ञांनी वर्धा येथे केले शेतकऱ्यांनामार्गदर्शन

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा वर्धा मार्फत शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रदर्शन व तीन दिवसीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात १९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वर्धा येथे चर्चा सत्राच्या द्वितीय सत्रात डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र दूधबर्डी नागपूर यांनी पशुसंवर्धनाचे महत्व तसेच ग्रामीण जोडव्यावसाय व रोजगारासाठी पशुसंवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात ४५ शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

Senior scientists guided the farmers at Wardha

On the occasion of the Amrit Mohotsav year of Independence, a sustainable agriculture technology exhibition and a three-day farmers' meet were organized through the Agricultural Technology Management System, Wardha. In this meeting on October 19, 2021, in the second session of the discussion session at Wardha, Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Agricultural Science Center Dudhbardi Nagpur gave guidance on the importance of animal husbandry as well as animal husbandry for rural adjuncts and employment. 45 farmers were present in this seminar.



जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा
6 h

कृषी तज्ञांनी केले शेतकऱ्यांना मार्गदर्शन
विविध चर्चासत्रांस शेतकऱ्यांची उपस्थिती
प्रदर्शन दालनांची चरखा सभागृह गजबजले

वर्धा, दि. १९ : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित तीन दिवशीत शेतकरी मेळाव्यात पहिल्या दिवशी कृषी तज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. असंख्य शेतकऱ्यांनी या मार्गदर्शन सत्रांचा लाभ घेतला. तर दिवसभर स्टॉलला शेतकऱ्यांनी भेटी दिल्या.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा वर्धा मार्फत शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रदर्शन व शेतकरी मेळाव्यात पहिल्या विविध विषयांवर तीन चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राची सुरुवात कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथील किटक शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत उंबरकर यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी खरीप व रब्बी पिकांवर येणाऱ्या किडीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच जंगली जनावरांपासून पिकांचे रक्षण, कपाशी पिकावरील बोंड अळीबाबत नियंत्रणाचे उपाय सुचविले.

चर्चासत्राच्या द्वितीय सत्रात रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक चंद्रशेखर हिवसे यांनी रबी पिकांकरिता लागवडीचे तंत्रज्ञान जमीन तयार करणे याबाबत माहिती दिली. यानंतर पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपुरचे सहाय्यक प्राध्यापक सारीपुत लांडगे यांनी पशुसंवर्धनाचे महत्व तसेच ग्रामीण जोडव्यवसाय व रोजगारासाठी पशुसंवर्धन या विषयावर मार्गदर्शन

Fig. Senior scientists guided the farmers

इतर विस्तार कार्य

१. पशुरोग निदान व चिकित्सा शिबीर

कृषी विज्ञान केंद्र, दूधबुर्डी, नागपूर, आणि पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिति रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने पशुरोग निदान व चिकित्सा शिबिराचे आयोजन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १, हिवरा बाजार अंतर्गत मौजा बेलदा येथे दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी करण्यात आला. सदर कार्यक्रमात प्रमुख उपस्थित डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र दुधबर्डी नागपूर यांनी जनावरांचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. पंचायत समितीच्या पशुधन विकास अधिकारी डॉ. अश्विनी गदमडे यांनी पशुआरोग्याबद्दल मार्गदर्शन केले तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १, हिवरा बाजार येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रिती सिरसाट यांनी विभागातील विविध योजनांबद्दल माहिती दिली. यावेळी बेलदा गावचे सरपंच श्री. उमेश भांडारकर उपस्थित होते. या शिबिरात बेलदा गावातील २०० पेक्षा जास्त जनावरांचे लसीकरण आणि उपचार करण्यात आले. शिबिरात ५० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

Animal Disease Diagnosis and Treatment Camp

Animal Disease Diagnosis and Treatment Camp was organized in association with Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur and Department of Animal Husbandry, Panchayat Samiti Ramtek on 17th September, 2021 at Mauja Belda under Veterinary Hospital Category 1, Hivra Bazar. Chief present in the said program Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Agricultural Science Center Dudhburdi Nagpur gave guidance on Animal Management. Livestock Development Officer of Panchayat Samiti Dr. Ashwini Gadamde gave guidance on animal health and Livestock Development Officer of Veterinary Hospital Category 1, Hivra Bazar Dr. Priti Sirsat informed about various schemes of the department. On this occasion the sarpanch of Belda village Shri. Umesh Bhandarkar was present. More than 200 animals of Belda village were vaccinated and treated in this camp. 50 farmers participated in the camp.

लोकमत

पशुरोग निदान व चिकित्सा शिबिर

पवनी (रामटेक) : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गतच्या कृषी विज्ञान केंद्र दुधबर्डी (ता. कळमेश्वर) व पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने पोषण वाटिका महाअभियानांतर्गत इफ्कोद्वारा भाजी बियाणे वाटप आणि पशुरोग निदान व चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. हिवराबाजार येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ अंतर्गतच्या बेलदा येथे झालेल्या कार्यक्रमात ५० शेतकऱ्यांना भाजी बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी २०० पेक्षा अधिक जनावरांना लसीकरण व उपचार करण्यात आले. डॉ. सारीपुत लांडगे यांनी जनावरांचे व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. इफ्कोचे राहुल नखाते यांनी नॅनो युरियाबाबत माहिती दिली. पशुधन विकास अधिकारी डॉ. अश्विनी गडमडे यांनी गुरांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रीती सिरसाट यांनी विविध योजनांची माहिती दिली. डॉ. प्रज्ञेय ताकसांडे यांनी पशुपालकांना आहारविषयक मार्गदर्शन केले. बेलदाचे सरपंच उमेश भांडारकर यांनी आयोजनासाठी सहकार्य केले.

Hello Nagpur Gramin
Page No. 2 Sep 22, 2021
Powered by: erelego.com

Fig. Organised Animal Disease Diagnosis and Treatment Camp

२. महाभियान या अभियाना अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, दूधबुर्डी आणि एफको द्वारा प्रायोजित भाजी बियाणे वाटप

कृषी विज्ञान केंद्र, दूधबुर्डी, नागपूर, आणि IFFCO यांच्या संयुक्त विद्यमाने पोषण वाटिका महाभियान या अभियाना अंतर्गत एफको द्वारा प्रायोजित भाजी बियाणे वाटप कार्यक्रम दिनांक १८ सप्टेंबर, २०२१ रोजी रामटेक तालुक्यातील बेलदा येथे करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित डॉ. सारीपुत लांडगे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र दूधबुर्डी नागपूर यांनी संतुलित आहाराबद्दल मार्गदर्शन केले तसेच एफको चे श्री. विजय मगर यांनी नॅनो यूरिया याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात ५० पेक्ष्या जास्त अंगणवाडी सेविकांना आणि शेतकऱ्यांना भाजी बियाणांचे वाटप करण्यात आले तसेच याप्रसंगी वृक्षारोपण आणि लिंबाच्या रोपांचे वाटप करण्यात आले.

Krishi Vigyan Kendra, Dudhburdi organised Distribution of vegetable seeds sponsored by IFFCO under Mahabhiyan

Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur was conducted vegetable seed distribution program sponsored by IFFCO on September 18, 2021 at Belda in Ramtek Taluka under the mission Poshan Vatika Mahabhiyan in association with IFFCO. The chief attendee in this program was Dr. Sariput Landge, Senior Scientist and Head, Krishi Vigyan Kendra, Dudhburdi, Nagpur gave guidance on balanced diet and Mr. Vijay Magar, FCO guided us about Nano Urea. Vegetable seeds were distributed to more than 50 Anganwadi workers and farmers in the said program and tree plantation and lemon saplings were also distributed on this occasion.

सावनेर में किसानों और आंगनवाड़ी सेविकाओं को सब्जी के बीजों का वितरण और वृक्षारोपण

September 19, 2021

नागपुर की सावनेर तहसील में सब्जी बीज वितरण कार्यक्रम का आयोजन किया गया।

सुनो सुनो | सावनेर/ नागपुर

नागपुर की सावनेर तहसील में सब्जी बीज वितरण कार्यक्रम का आयोजन किया गया। यह कार्यक्रम महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपुर के मार्गदर्शन में हुआ। कलमेश्वर के दुधबर्डी स्थित कृषि विज्ञान केंद्र और इफको ने संयुक्त रूप से कार्यक्रम के आयोजन की जिम्मेदारी ली।

कार्यक्रम पोषण वाटिका महाभियान का हिस्सा था।

Fig. Organised Distribution of vegetable seeds sponsored by IFFCO under Mahabhiyan